Kisan Shikshan Prasarak Mandal,
Borgoan (Kale) Tq. & Dist. Latur's



**NAAC Accredited 'B' Grade**

# Vasantrao Kale Mahavidyalaya,

## Dhoki. Tq & Dist - Osmanabad.

&

## Akhil Maharashtra Itihas Parishad, Pune

**Jointly Organize**

**One Day International Conference on**

# "The History of Pandemic like Covid-19 & Its Impat on Socio-Economic & Political Sectors in the World"

**Tuesday, 20th October 2020**

**ISSN No. : 2278-9308**

**Impact Factor : 7.675**

Editor
**Dr. N. P. Manale**
(Convenor)

Chief Editor
**Dr. Satish Kadam**
(President, AMIP)

Executive Editor
**Dr. Haridas Fere**
(Principal)

**Organized by**

**Department of History**
Kisan Shikshan Prasarak Mandal, Borgoan (Kale) Tq. & Dist. Latur's
**VASANTRAO KALE MAHAVIDYALAYA, DHOKI**
Tq & Dist.- Osmanabad - 413508

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 51 | Covid 19 चा भारताच्या ग्रामीण व शहरी जीवनावर होणारा परिणाम : एक अभ्यास डॉ. चंद्रशेखर पाटील | 191 |
| 52 | महामारी : इतिहास तथा सामाजिक व आर्थिक परिणाम **प्रा. नयन भादुले -राजमाने** | 194 |
| 53 | कोरोना महामारीचा पर्यटन क्षेत्रावर झालेला परिणाम **श्रीमती शिंदे मीनाक्षी प्रल्हादराव** | 197 |
| 54 | स्थलांतर : करोना काळातील लक्षवेधी **प्रा. रमेश अंबऋशी शितोळे** | 201 |
| 55 | कोरोना संसर्गाचा पर्यटन क्षेत्रावर होणारा परिणाम ***प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु.*** | 203 |
| 56 | कोरोनाची परिस्थिती आणि मराठी कवितेतील प्रतिमा प्रा. डॉ. गोविंद काळे | 209 |
| 57 | कोविड १९-चे आरोग्य, शैक्षणिक, रोजगार आणि सांस्कृतिक क्षेत्रावरील परिणाम : एक अभ्यास प्रा. डॉ. ज्ञानदेव शिवनाथ नागवे | 213 |
| 58 | कोरोना विषाणु — शोध, आजार व उपाययोजना प्रा.डॉ. कदम सतिश रावसाहेब | 216 |
| 59 | कोरोनाचे भय आणि बिघडलेली सामाजिक स्थिती प्रा. डॉ. तुळशीराम चंद्रसेन उकिरडे | 219 |
| 60 | कोव्हीड-१९ च्या महामारीचा भारतीय समाज जीवनावर झालेला परिणाम **प्रा. गायकवाड डी.डी.** | 224 |
| 61 | कोरोना महामारी आणि भारतीय ऑनलाईन शिक्षण पद्धतीतील बदल प्रा.अर्जुन बंडू गजमल | 227 |
| 62 | दुसऱ्या जागतिक शीतयुद्धाच्या वाटचालीत कोव्हीड-१९भूमिका— एक चिकित्सक अभ्यास प्रा.अरूण वसंत अवसरमल | 230 |
| 63 | कोविड- १९ चा मानवी समाजजीवनावर झालेला परिणाम **प्रा.कांबळे रोशनी बाबुराव** | 238 |
| 64 | महामारी व कोविड १९- चा इतिहास एक दृष्टिक्षेप प्रा. डॉ. महादेव गणपत देशमुख | 242 |
| 65 | कोवीड—१९ चा भारतातील ग्रामिण व शहरी जीवनावरील परिणाम सौ. शितल संभाजी सावंत | 247 |





Scanned by CamScanner

ISSN : 2278-9308
November 2020

# कोरोना संसर्गाचा पर्यटन क्षेत्रावर होणारा परिणाम

*प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु.*
इतिहास विभाग प्रमुख शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

**प्रस्तावना :**

जगभरातील विविध घटना घडामोडी प्राचीन काळापासूनच घडत आल्या आहेत. या घटणाऱ्या घटना-घडामोडीने जगाला अल्प काळ दिसणारे तर काही दिर्घकाळ दिसणारे, किंवा कायमचेच असे परिणाम दिले असल्याचे दिसून येतात. अलीकडच्या काळात अमेरिकेतील एका प्रतिष्ठीत माध्यमाने सन 1999 मध्ये अमेरीका देशात एक मोठे सर्वेक्षण केले होते. त्याचा उद्देश असा होता की, जगामध्ये 20 व्या शतकात घडून गेलेल्या कोणत्या घटना-घडामोडीने मानवाला अधिक प्रभावीत केले आहे. या सर्वांचे सर्वेक्षण करून जेव्हा त्यांनी या घटनांची क्रमवारी लावली तेव्हा सर्वात जास्त एकुण 71 टक्के लोकांनी आपली पसंती ही दुसरे महायुद्ध या घटनेला दिले. अशा प्रकारे जर 1920 ते 2020 या कालखंडाचे अशा प्रकारचे सर्वेक्षण केले गेले तर सर्वात पहिला पसंतीचा क्रमांक येऊ शकतो तो म्हणजे कोरोना विषाणुच्या साथीला. असो आज घडीला कोरोना विषाणुने जगभर थैमान घातले आहे. त्यामुळे सर्व मानवाचे जीवन विस्कळीत झाले आहे. अनेकांनाया विषाणुची लागण झाली आहे. यात अनेकाने आपले स्वकिय, मित्रपरिवारातील व्यक्ती गमविल्या आहेत. या विषाणुचा फैलाव रोखण्यासाठी प्रत्येक राष्ट्राने आपआपल्या परिने उपाय योजना केल्या आहेत. यामध्ये प्रभावी माध्यम म्हणून लॉकडाऊनचा वापर करण्यात आला. त्यामुळे अनेक व्यवसायांना मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे. सदरील शोधलेखातून कोरोनाचा पर्यटन व्यवसायावर काय परिणाम झाला आहे. या विषयीचा आढावा घेण्यात आला आहे.

**कोरोना संसर्गाचा पर्यटन क्षेत्रावर होणारा परिणाम**

चीन मधील कोरोणा विषाणुच्या उद्रेकामुळे जगभरात चिंतेचे वातावरण आहे. साहजिकच याचा परिणाम पर्यटनावर होत आहे. करोना विषाणुच्या परिणामामुळे पर्यटनासाठी भारतात येणाऱ्या इतर देश व चीनमधील नागरिकांच्या संख्या 100 टक्क्यांनी कमी झाली असल्यामुळे याचा भारतातील पर्यटनावर गंभीर परिणाम होत असल्याचे तज्ञांकडून सांगितले जात आहे. दरवर्षी फेब्रुवारी ते मे या कालावधीत इतर देशांबरोबरच चीनमधील हजारो पर्यटक भारतात भेटी देत असतात. विशेषता यात भारतीय प्राचीन शैलीतील मंदिर, बौद्ध विहार, विविध प्राचीन पर्यटन स्थळांना भेटी देणाऱ्या पर्यटकांची संख्या तुलनेने अधिक असते.[1] या कोनोराच्या काळात मात्र ही संख्या कमालीची घटल्याचे दिसून येत आहे. कोरोनाच्या धसक्याने देशांतर्गत आणि देशाबाहेरील पर्यटनावर प्रचंड परिणाम झाला असून माणसे घराबाहेर पडण्यासही घाबरत आहेत आणि त्यामुळे प्रवास नको आणि पर्यटनही नको असा सार्वत्रिक प्रभाव सुरू झला आहे. याचा परिणाम म्हणुन पर्यटन स्थळे ओस पडायला लागली आहेत.[2] एखादा माणुस घरातुन बाहेर पडला की तो किमान 10 जणांना तरी रोजगार रुपाने काम देत असतो. परंतु सर्व क्रिया कोरोणा काळात थांबल्याचे दिसत आहे.

जगात सगळ्याच कंपन्यांना कोरोना व्हायसरचा दणका बसत असला तरी पर्यटन व्यवसाय व त्यावर अवलंबुन असणाऱ्या व्यवसायाला या परिस्थितीचा सर्वात मोठा धक्का बसत असलयाचे दिसत आहे. सध्या भारताचा विचार केला तर, अनेकांनी आपल्या परदेश पर्यटनाचे दौरे रद्द केले आहेत. त्याचप्रमाणे युरोपातील किंवा कोरोना प्रभावित देशामधील पर्यटकांना भारतामध्ये येण्यास बंदी केली गेली आहे. त्यामुळे भारताच्या व जगभरातील पर्यटन व्यवसायालाही मोठी हानी सहन करावी लागणार आहे. जगभरातील अनेक विमानांचे उड्डाने रद्द करण्यात आली, पर्यटनासाठी सज्ज असणाऱ्या आलिशान क्रुझ शीप बंदरावर पडून उभ्या आहे.[3] ही परिस्थिती संबध जगभर असल्या कारणाने या व्यवसायावर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे अवलंबून असणाऱ्या जगातील किमान पाच कोटी कर्मचाऱ्यांना



Scanned by CamScanner

स्वतःच्या नोकऱ्या गमवाव्या लागणार असल्याची शक्यता वर्ल्ड ट्रॅव्हल अॅन्ड टुरिझम कॉन्सिल या संस्थेने वर्तवली आहे. जगभरातील कोरोना विषाणुच्या संसर्गाचा धसका पर्यटकांनी घेतला असल्याने आंतरराष्ट्रीयच नव्हे तर राष्ट्रीय पर्यटनावर याचा परिणाम झाला आहे. एप्रिल व मे महिन्यातील कालावधी हा सुट्ट्याचा असल्याने जानेवारी, फेब्रुवारी या महिन्यात पर्यटक हे पर्यटनांसाठी आवडीनुसार आगाऊ आरक्षण करीत असतात मात्र या कोरोणा मुळे केलेले आरक्षण रद्द करीत आहेत. शिवाय नवीन आरक्षण तर पूर्णतः बंद केले गेले आहे. कोरोना विषाणु संसर्गा बाबतचा धसका घेतल्या गेल्यानेच आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य पातळीवरील पर्यटनावर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळेच अनेक देशी, विदेशी राज्यअंतर्गत सहलीचे आयोजन करणाऱ्या व्यवसायीकांना याचा आर्थिक फटका बसताना दिसत आहे.[4] कोरोना विषाणुचा संसर्ग टाळण्यासाठी त्याची साखळी तोडण्यासाठी गदीच्या ठिकाणी जाऊ नये अशा ठिकाणापासून लांब रहावे अशा सुचना शासनाने दिल्या आहेत. त्यामुळे पर्यटकांच्या मनात भिंती निर्माण होऊन पर्यटक परदेशी व देशाअंतर्गत सहलीवर जाणे टाळत आहते. याचा परीणाम पर्यटनावर होताना दिसून येत आहे.

कोरोना साथीमुळे लॉकडाऊन आणि प्रवासबंदी ची घोषणा करण्यात आल्याने पर्यटन व्यवसायाला याचा मोठे फटका बसला जगातील व देशातील ट्रॅव्हल इंडरस्ट्रीज ही मुळातच प्रवासाशी संबंधित आहे आणि आता ही कोरोनामुळे बंद पडली आहे. प्रत्येक टुर मॅनेजरचे काम हे पर्यटकां सोबत फिरणे व त्या पर्यटन स्थळ विषयी महीती सांगने हे असते. वर्क फ्रॉम होम असा ऑप्शनच आमच्याकडे नाहीए त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत आम्ही जॉबलेस असल्यासारखेच आहोत एका नामांकित पर्यटन कंपनीमध्ये टुर मॅनेजर म्हणुन काम करणारी आमृता प्रधाने सांगतले आहे. लॉकडाऊन मुळे आंतरराष्ट्रीय प्रवास सोडा अगदी जिल्हा-जिल्ह्याच्या सीमाही बंद होत्या. अशा वेळी पर्यटन व्यवसाय पूर्णपणे ठप्प झाला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे सर्व संपुन लोक पुन्हा प्रवासाला कधी करणार या बद्दल ही कमालीची अनिश्चितता आहे. या सर्व चिंतने सर्व ट्रॅव्हल इंडस्ट्रीज ग्रासले आहे. या सर्व अनिश्चिते बद्दल बोलताना अमृताने म्हटले, कोरोनाचा सगळ्यात पहिला फटका हा पर्यटन व्यवसायाला बसला आणि या धक्यातुन सर्वात शेवटी जर कोणता व्यवसाय सावरणार असेल तर तो पर्यटनच आहे.[5] यामुळे या कोरोना साथीमुळे जणुकाही पर्यटन क्षेत्राचे कंबरडे मोडले आहे. जगात मंदीची लाट येऊ घातली, त्याचा फटकाही पर्यटनाला बसणार आहे. त्या पार्श्वभुमीवर पर्यटन क्षेत्रात आमुलाग्र बदल होण्याची शक्यता ही नाकारता येत नाही येणाऱ्या काळात अनेक छोट्या आणि मध्यम प्रकारच्या ट्रॅव्हल एजन्सी, टुर ऑपरेटर अंशतः किंवा पूर्णतः बंद पडण्याचा धोका आहे. या साथीच्या रोगाचा प्रभाव परदेशातून झाला असल्यामुळे परदेशी प्रवाशांबद्दल आपल्याला एक प्रकारची भिती दिसुन येणार आहे. देशी अथवा परदेशी पर्यटक जी पर्यटन ठिकाणे जास्त सुरक्षित आहेत. आणि आरोग्याच्या सेवा जास्त चांगल्या मिळतात अशा ठिकाणांना जास्त प्राधान्य देणार आहेत. परदेशातुन भारतात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांनामध्ये सर्वात जास्त टक्केवारी ही 60 पेक्षा अधिक असते. परंतु कोरोना साथीचा सर्वात जास्त प्रभाव हा या जेष्ठ किंवा 60 पेक्षा अधिक वय असणाऱ्या व्यक्तींवर पडत असल्याने त्यांचा आत्मविश्वास कमी झाला असण्याची शक्यताही नाकारता येत नाही. आणि त्यामुळेच त्याचा परिणाम जगातील पर्यटनावर झाल्याशिवाय राहणार नाही.[6] त्यामुळेच कोरोना विषाणुमुळे निर्माण झालेली ही परिस्थिती बदलल्यास पर्यटन व्यवसायातील तज्ञ व्यक्तींच्या मते साधारणपणे पुढील दीड ते दोन वर्षे एवढा किंवा त्यापेक्षाही प्रदीर्घ कालावधी लागु शकतो.

भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये पर्यटन व्यवसायाचा हिस्सा 9.02 टक्के तर जगाच्या जीडीपीत दहा टक्के इतका आहे. भारत देश 2018 या वर्षात भारताला पर्यटन या व्यवसायापासुन 28.06 अब्ज डॉलरची कमाई झाली होती. मागील काही वर्षा पासुन पर्यटनाला जाणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत चालली असल्या कारणामुळे आणि पर्यटन स्थळावरील योग्य अशा सोयी सुविधांच्या उपलब्धतेच्या वाढीमुळे. ही संख्या वाढत गेलयाने. या क्षेत्राची उलाढाल 2025 सालापर्यंत 2018 सालाच्या जवळपास दीडपट होईल असे अनुमान अगदी फेब्रुवारी महिन्यापर्यंत वर्तवले जात होते.[7] परंतु एकाएकी कोरोना विषाणुचे संकट आले आणि तसे पाहता त्याचा पहिला बळी गेला पर्यटकाचा. विविध पर्यटनस्थळी पर्यटकांवर अवलंबून राहणारे हॉटेल व्यवसायिक, टॅक्सी व्यवसायीक, पर्यटना संबंधी



Scanned by CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 252 (CCXLII)
ISSN : 2278-9308
November 2020

अन्य सेवा देणारे व्यवसायीक, छोटे-मोठे विक्रेते या सर्वांचे उदरनिर्वाहाचे, रोजीरोटीचे साधन बंद झाले. त्यामुळे पर्यटन व्यवसायातील ही रोजगारची साखळी अनिश्चित काळासाठी विस्कळीत झाली.

सारांश रुपाने म्हणता येईल की, कोरोना विषाणुच्या साथीचा पहिला बळी गेला तो पर्यटनाचा व यावर अवलंबून असणाऱ्या लहान-मोठ्य अशा अनेक व्यवसायीकांचा, रोजीरोटीचा एकंदरीत या कोरोना परिस्थितीमुळे देशी-विदेशी व राज्यअंतर्गत अशा सर्व प्रकारच्या पर्यटनावर या कोरोना साथीमुळे संक्रात कोसळली आहे. यामुळे अनेक लोक आपल्या रोजगाराला मुकणार आहेत यावर अवलंबून असणारे अनेक व्यवसाय बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. किंवा बंद पडणार आहेत. अशा भयावह परिस्थिती पर्यटनावर आली आहे आणि ती कधी दूर होईल या विषयी मात्र निश्चितपणे आज तरी सांगणे कठीण आहे.

संदर्भ सुची :

1) www.dainikbha.com पर्यटन क्षेत्रालाही कोरोनाची लागण
2) Max Maharashtra कोरोना, डरोना आणि मरोना
3) esakal.com कोरोनामुळे नोकऱ्या जाणार, या क्षेत्राला...
4) M.lokmat.com. Impact on Corona Tourist...
5) Bbb.com. कोरोना पर्यटन लॉकडाऊन आणि....
6) Maharashtratimes.com Ravivar mata new
कोरोना : पर्यटनासाठी संकटकी संधी
करोना संसर्गाचा पर्यटन क्षेत्रावर होणरा परिणाम

Scanned by CamScanner